**पोलीस निरिक्षक,गुन्हे युनिट -१, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड**
यांचे कार्यालय मोहननगर,चिंचवड,पुणे - ४११०१९
ई मेल आयडी. Picrimeunit1.pcpc-mh@gov.in

**प्रेस नोट ता.०९/०४/२०२४**

## बनावट पोलीस चारित्र पडताळणी प्रमाणपत्र तयार करणा-या इसमास गुन्हे शाखेने केले जेलबंद.

आज रोजी गुन्हे शाखा,युनिट १ चे पोलीस उपनिरीक्षक शिवाजी कानडे कर्तव्यावर असताना त्यांना गोपनीय बातमी मिळाली की, सुलभ कॉलनी राहटणी,पुणे येथे एक इसम पोलीस चारित्र पडताळणीचे बनावट प्रमाणपत्र तयार करुन लोकांना देवून त्यांची फसवणुक करीत आहे.

गुन्हे शाखा, युनिट १ कडील वरीष्ठ पोलीस निरीक्षक, गोरख कुंभार, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी कानडे, पोलीस अंमलदार मनोजकुमार कमले, बाळु कोकाटे, विशाल भोईर असे बातमीचे ठिकाणी सुलभ कॉलनी राहटणी,पुणे येथे गेले असता मिळालेल्या बातमीप्रमाणे एक इसम हा एका रुममध्ये लॅपटॉप व इतर साहीत्याचे आधारे खाजगी कंपनीमध्ये नोकरीसाठी आवश्यक असलेले बनावट पोलीस चारित्र पडताळणी प्रमाणपत्र तयार करीत असतांना मिळून आला.

सदर इसमास जागीच साहीत्यासह ताब्यात घेवून त्यास त्याचे नांव पत्ता विचारता त्याने त्याचे नांव गणेश संजय कुंजकर वय २४ वर्षे रा. बेघरवस्ती, मु.पो. भुंईज ता.वाई जि.सातारा असे सांगीतले त्याचेकडे अधिक चौकशी करता तो सुमारे एक वर्षापासुन पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड यांचे नावे बनावट पोलीस चारित्र पडताळणी प्रमाणपत्र तयार करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच त्याचे कडून सुमारे ४०,०००/- रुपये किंमतीचे मुद्देमाल (त्यामध्ये लॅपटॉप,मोबाईल फोन) व ५१ पोलीस चारित्र पडताळणीचे बनावट प्रमाणपत्र जप्त करण्यात आली आहेत. सदर इसमाविरुध्द वाकड पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करुन त्यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे, अपर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री संदिप डोईफोडे, सहा.पोलीस आयुक्त श्री विशाल हिरे, सहा.पोलीस आयुक्त श्री बाळासाहेब कोपनर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गौरख कुभार, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी कानडे, पोलीस अंमलदार मनोजकुमार कमले, बाळु कोकाटे, अमित खानविलकर, सोमनाथ बो-हाडे, महादेव जावळे, गणेश महाडीक, सचिन मोरे,प्रमोद हिरळकर, स्वप्निल महाले, विशाल भोईर, मारोती जायभाये, अजित रुपनवर, तानाजी पानसरे यांनी केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
**पोलीस उप आयुक्त (गुन्हे)**
**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय,पुणे.**